# ऐक्य

## श्रीगुरुमाईंसोबतचे प्रसंग

## श्री मुक्तानंद आश्रम येथे झालेल्या आनंदमय जन्मदिवस २०१७च्या सत्संगांमधून

गुरुमाईंसोबतचा प्रसंग : १

लीलावती स्टुअर्ट सटक्लिफ्

वर्ष १९८०मध्ये, साधारणपणे २०वर्षांची असताना, मी गुरुदेव सिद्धपीठात गेले होते. मी तिथे पोहोचल्यानंतर लवकरच मला गुरुचौकात गुरुमाईंचे दर्शन झाले. त्यांनी अत्यंत प्रेमाने माझे स्वागत केले होते! गुरुमाईंनी मला सूचित केले की, या माझ्या सेवा यात्रेदरम्यान मी आंतरिक कार्यासाठी वेळ देणे, माझ्या साधनेवर लक्ष केंद्रित करणे आणि अंतरात पाहणे, या सर्व गोष्टी माझ्यासाठी हितकारक असतील.

हे केंद्रण टिकवून ठेवण्याप्रति मी खूपच उत्साही होते. मी ते कसे करेन, याचा विचार मी मनातल्या मनात करत होते. मी विचार केला होता, मी खूप ध्यान करेन! आणि अशा प्रकारे माझे अंतर्जगत स्वतःला माझ्यासमोर प्रकट करेल.

मला अमृत कॅफेची 'संपर्काधिकारी' म्हणून सेवा मिळाली होती. त्या काळी अमृतमध्ये दररोज जवळजवळ तीनशे लोक येत असत. माझ्या या आश्रमातील वास्तव्यादरम्यान अमृत पॅविलियनच्या नुतनीकरणाचा प्रॉजेक्ट सुरू होता, ज्याच्या अंतर्गत जेवणाची जागा विस्तारित करता यावी म्हणून मोठमोठ्या भिंती पाडण्यात येत होत्या. नुतनीकरण प्रकल्पाच्या मॅनेजरसह काम करताना, अमृतमधील सर्व कार्ये सुरळीतपणे चालू ठेवण्यावर लक्ष ठेवणे, ही माझी भूमिका होती. उदाहरणार्थ, आम्हाला कधीकधी जेवायला बसण्यासाठी लागणाऱ्या जागेची तात्पुरती व्यवस्था बागेत करावी लागत असे, जेणेकरून लोकांना जेवण करण्यासाठी व बसण्यासाठी जागा मिळावी. पुष्कळदा, या सर्व गोष्टी सहजतेने चालू ठेवणे मला आव्हानात्मक वाटत असे.

ठरवल्याप्रमाणे गोष्टी जर घडल्या नाहीत, तर त्यावेळी फक्त मी अमृतमधून बाहेर पडावे आणि ध्यानगुफेत जाऊन गुरुमाईंनी मला जे करण्याविषयी मार्गदर्शन केले होते, ते आंतरिक कार्य करावे, अशी इच्छा मला होत असे. तरीदेखील, मी हे जाणत होते की, माझ्यासाठी सेवा करत राहणे महत्त्वाचे होते आणि त्याहूनही जास्त महत्त्वाचे होते, गुरुमाईंच्या मार्गदर्शनाचे अनुसरण करणे. त्यामुळे मी असा विचार केला की, मला जर ध्यानगुफेत जाता येणे शक्य नसेल, तर सेवा करत असताना आंतरिक कार्य करण्यासाठी असलेला मार्ग मी शोधून काढेन!

मी असे ठरवले की, लोकांशी आणि माझ्या कार्यांशी स्वतःला जोडण्याआधी, सर्वप्रथम मी माझ्या हृदयातील जागेशी नाते जोडेन. आणि माझ्या हे लक्षात आले की, जितकी जास्त मी माझ्या कार्यांना माझ्या हृदयातील जागेला जोडत गेले, तितकी जास्त कार्ये मी पार पाडू लागले. ज्या अडचणींवर मात करणे कठीण वाटत असे, त्या दूर करणे खरेतर खूप सोपे होते! मला याचा शोध लागला की, माझ्या अंतरातील शांततेचा अनुभव घेण्यासाठी मला ध्यानगुफेत असण्याची गरज नाही. कार्यरत असतानादेखील शांतचित्त असणे खूप छान वाटत असे.

माझ्या सेवा यात्रेतील शेवटच्या काही दिवसांमध्ये एके दिवशी, मी गुरुमाईंना सुंदर बगीच्यात फिरताना पाहिले. गुरुमाईंनी मला त्यांच्याबरोबर फिरायला येण्यासाठी आमंत्रित केले आणि त्यांनी माझ्या आश्रमातील वास्तव्याविषयी चौकशी केली. गुरुमाईंनी विचारले, “तू काय केलेस?” एक संपर्काधिकारी म्हणून माझी जी सेवा होती, त्याविषयी बोलण्यास मी सुरुवात केली. गुरुमाईंनी मला परत विचारले, “तू काय केलेस?” मला नक्की काय सांगावे ते कळत नव्हते, त्यामुळे मी गप्प राहिले. गुरुमाई हसल्या आणि म्हणाल्या, “तू भिंती पाडल्यास!”

गुरुमाईंनी पुन्हा एकदा मला विचारले, “तू काय केलेस?” मी म्हणाले, “मी भिंती पाडल्या!” ज्या क्षणी मी स्वतःला हे चार शब्द म्हणताना ऐकले, त्या क्षणी माझ्या हे लक्षात आले की, मी अमृतच्या भिंतींविषयी बोलत नव्हते.

गुरुमाईंनी मला हे दाखवून दिले की, माझे हृदय आणि माझी कार्ये यांच्यात कोणतेही अडथळे नाहीत. गुरुमाईंच्या मार्गदर्शनाचे अनुसरण केल्यामुळे, सेवा करत असताना हृदयाशी कसे जोडलेले राहावे, हे मी शिकले. माझ्या हे लक्षात आले की, माझ्या आतमध्ये असणारी जागा बाहेरच्या बाजूस असणाऱ्या जागेत प्रवाहित होऊ शकते आणि मी जे साध्य करायचे ठरवले आहे, ते अतिशय सहजतेने प्राप्त करण्यासाठी ती मला मार्गदर्शन करते. धन्यवाद, गुरुमाई.

गुरुमाईंसोबतचा प्रसंग : २

शरणी बर्न्ज

वर्ष २००२मध्ये मी एस. वाय. डी. ए. फाउंडेशनची स्टाफ सदस्या म्हणून सेवा अर्पण करण्यासाठी पर्थ, ऑस्ट्रेलिया येथे असलेल्या माझ्या घरातून श्री मुक्तानंद आश्रमात गेले.

काही वर्ष तिथे सेवा केल्यानंतर, एके दिवशी मला माझ्या घराची खूपच आठवण येत होती. अमेरीकेत त्या दिवशी सार्वजनिक सुटीचा दिवस होता आणि आश्रमातील बरेचसे सेवाकर्ते आपापल्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेले होते.

मला नित्यानंद लेकजवळ फिरायला जाण्याची तीव्र इच्छा झाली. तिथे फिरत असताना जेव्हा मी गुरुमाईंना माझ्या दिशेने येताना पाहिले, तेव्हा मला खूपच आनंद झाला. त्या एका महिलेबरोबर चालत येत होत्या, जिला याआधी मी पाहिले होते, पण तिच्याशी ओळख झाली नव्हती. मी अत्यंत प्रसन्नतेनेने गुरुमाईंना अभिवादन केले आणि पुन्हा चालायला सुरुवात केली.

गुरुमाई थांबल्या आणि त्यांनी मला माझ्या नावाने हाक मारली. त्यांनी मला विचारले की, ज्या महिलेबरोबर त्या फिरत होत्या, तिला मी भेटले आहे का? मी म्हणाले, “नाही गुरुमाई, मी नाही भेटले.” गुरुमाई म्हणाल्या की, आम्ही दोघी ऑस्ट्रेलियातील आहोत त्यामुळे त्यांना असे वाटले की, आम्हा दोघींसाठी बऱ्याचशा गोष्टी सारख्या असतील. मग त्यांनी मला त्यांच्याबरोबर लेकभोवती फिरायला येण्यासाठी बोलावले.

चालताचालता बोलत असताना त्या महिलेने आणि मी, आपापल्या जीवनाच्या गोष्टी एकमेकींना सांगितल्या आणि आमच्या लक्षात आले की, आमच्यात खरोखरच बऱ्याचशा गोष्टी समान होत्या. मला जाणवले की, मला घरच्या ओढीने लागून राहिलेली खंत, नाहीशी होऊ लागली होती.

गुरुमाईंनी म्हणाल्या की, मेक्सिकोतून आलेले स्टाफ सदस्य आणि व्हीजीटिंग सेवाकर्ते एकमेकांच्यात खूप छान मिळून-मिसळून राहतात, पण ऑस्ट्रेलियातील सेवाकर्त्यांच्या बाबतीत मात्र असे होत नाही, असे त्यांनी पाहिले आहे. ते अगदी खरे असल्यामुळे आम्ही सर्वजणी हसलो! अमृत कॅफेमध्ये जवळजवळ दररोज मी मेक्सिकोतून आलेल्या सेवाकर्त्यांना एका लांब टेबलाभोवती बसलेले पाहात असे. ते सर्वजण अत्यंत प्रफुल्लतेने आणि उत्साहाने एकमेकांशी हास्यविनोद करून बोलत असत.

त्यानंतर एक-दोन दिवसांनी गुरुमाईंच्या आग्रहाखातर आश्रमात ऑस्ट्रेलियातील सर्व सेवाकर्त्यांसाठी एक प्रसाद सभा आयोजित करण्यात आली. आम्हाला जे काही वाढण्यात आले, ते सर्व ऑस्ट्रेलियाचे होते! ऑस्ट्रेलियाचे चॉकलेटस्, कुकीज्, मिठाई, केक्स्, आणि ऑस्ट्रेलियाचा चहा. तिथे आम्ही बरेचसे असे लोक होतो, जे एकमेकांना याआधी कधी भेटलो नव्हतो किंवा एकमेकांना जाणून घेण्यासाठी आम्ही वेळच दिला नव्हता. आता तसे केल्यामुळे मला गहिवरून आले. आम्ही आमच्या साधनेचे अनुभव एकमेकांना सांगितले आणि त्याबरोबरच ऑस्ट्रेलियातील आमच्या पसंतीच्या जागांविषयी आणि तेथील उपक्रमांविषयी एकमेकांना सांगितले. आणि आमच्यातील एखाद्या व्यक्तीने जर ऑस्ट्रेलियाच्या एखाद्या विलक्षण गोष्टीचा उल्लेख केला, तर आम्ही सर्वजण मोठ्या उत्साहाने त्याच्या म्हणण्याला संमती देत होतो. आणि आम्ही हसलो — भरपूर हसलो.

मला आठवते की, माझ्या सभोवती ऑस्ट्रेलियाच्या माझ्या सहकारी सेवाकर्त्यांना पाहात असताना मला किती तणावमुक्त, खुले आणि आनंदी जाणवत होते. गुरुमाईंनी आम्हाला एकत्र आणण्याआधी मला हे माहितही नव्हते की, मी त्या सर्वांशी नाते जोडू शकेन. मी कृतज्ञतेने पूरित झाले होते.

त्या प्रसाद सभेच्या प्रसंगानंतर, मला पुन्हा एकदा गुरुमाईंच्या दर्शनाचे सौभाग्य प्राप्त झाले. गुरुमाई मला म्हणाल्या की, माझ्या ऑस्ट्रेलियन सहकाऱ्यांसह झालेल्या दुपारच्या चहापानाने मला उत्साहित केले असेल, अशी अपेक्षा त्यांना होती. माझे संपूर्ण अस्तित्व सुखावले. अतिशय सुंदर अशा ऑस्ट्रेलियन लोकांच्या प्रसाद सभेच्या माध्यमातून आम्हा सर्वांना एकत्र आणण्यासाठी मी गुरुमाईंना धन्यवाद दिले.

गुरुमाईंबरोबर झालेल्या या संवादामुळे, परस्परसंपर्कामुळे आणि त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रसादामुळे, मला माझ्या सभोवती असणाऱ्या लोकांबरोबर एकत्र येण्याचे महत्त्व अधिक स्पष्टतेने समजले. फक्त ऑस्ट्रेलियन लोकांबरोबर असलेल्या माझ्या वागणूकीसाठीच नाही तर मी ज्यांच्या संपर्कात येते त्या सर्व लोकांसाठी गुरुमाईंची ही शिकवण मी हृदयापासून स्वीकारली आहे. वारंवार, मला त्या फायद्यांचा अनुभव आला आहे जे लोकांशी ओळख करून घेण्याच्या प्रयत्नामुळे प्राप्त होतात — आपल्यातील समानता जाणून घेतल्यामुळे आणि आपल्या संबंधांमधील आत्मीयतेचा आनंद उपभोगल्यामुळे.

धन्यवाद, गुरुमाई.

© २०१७ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.